**मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण**
**द्रुतगती मार्गाची क्षमता वाढ**
**करणेबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**

शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस २०१५/प्र.क्र.४७५/रस्ते-८,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०१७.

**पार्श्वभूमी :-**

मुंबई पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग-४ हे दोन्ही कॉरीडॉर सुधारणा तथा देखभाल, दुरुस्तीसाठी “बांधा, वापरा व हस्तांतरीत करा” या तत्वावर ३० वर्षाच्या सवलतीच्या कालावधीसाठी शासनाने सन १९९९ पासून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे हस्तांतरीत केले आहेत. मुंबई पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग-४ हे खालापूर टोल प्लाझाजवळ एकत्र मिळतात व पुढे खंडाळा एक्झीट येथे वेगळे होतात. अडोशी बोगदा ते खंडाळा एक्झीट ही लांबी ६ पदरी असून या भागात १० पदरी वाहतुक (द्रुतगती मार्ग ६ पदरी + राज्य महामार्ग ४ पदरी) येऊन मिळते. या लांबीत घाट व चढ उताराचे प्रमाण जास्त असून दरडी कोसळण्याचे प्रकार पावसाळ्यात वारंवार होत असतात. त्यामुळे मुंबईकडे येणारी डोंगरालगतची एक लेन ही पावसाळ्यापासून वाहतूकीसाठी बंद ठेवावी लागते. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दि.३०.११.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गातील खोपोली एक्झीट ते कुसगाव (सिंहगड संस्था) या भागातील १२ कि.मी. च्या राहीलेल्या लांबीसाठी (Missing Link) दोन बोगदे व २ व्हायाडक्टसह ८ पदरी नवीन रस्ता बांधण्याच्या कामास व खालापूर फुडमॉल ते खोपोली इंटरचेंज दरम्यान ८ पदरी उन्नत मार्ग बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचा सविस्तर अहवाल (DPR) तयार करताना Economic Benefit Analysis करुन समितीच्या मान्यतेसाठी फेर सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार सदर प्रकल्प कार्यान्वीत करण्यासाठी मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीची मान्यता घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या दि.१३.०६.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) सन २०१५-१६ च्या दरसूचीनुसार रु.४७९७.५७ कोटी एवढ्या भांडवली खर्चाच्या एकूण १९.८ कि.मी. लांबीच्या नवीन मार्गिकेसह (Missing Link) प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने इपीसी (EPC) तत्वावर सोबत जोडलेल्या परिशिष्टातील विवरणानुसार हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) सदर प्रकल्पाकरीता आवश्यकतेनुसार Special Purpose Vehicle स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्पाकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने स्वत: निधी उभा करावा.

४) सदर मिसिंग लिंक (Missing Link) प्रकल्पाचे बांधकाम, सवलत कालावधीतील देखभाल दुरुस्ती, सध्याच्या द्रुतगती मार्गाची दुरुस्ती, सन २०३० पासून मिसिंग लिंक (Missing Link) प्रकल्पाचा सवलत कालावधी इतक्या कालावधीतील देखभाल दुरुस्ती व परिचालन यासाठी येणाऱ्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महामंडळास उभारण्यास येणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर + २% अंतर्गत परतावा दर मंजूर करण्यात येत आहे.

५) वरीलप्रमाणे अंतर्गत परतावा दरानुसार परिगणित होणाऱ्या सवलत कालावधीमध्ये सन २०३० नंतर दर दहा वर्षांनी किंवा आवश्यकतेनुसार वाहतूक वर्दळ तपासणी Real Time पध्दतीने करण्यात यावी त्यानुसार सवलत कालावधी पुनर्निधारित करण्यात येईल. ही बाब सवलत करारनाम्यात नमूद करण्यात यावी.

६) सदर प्रकल्पासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाबरोबर केंद्र शासनाच्या नमुना सवलत करारनाम्यात आवश्यक ते बदल करुन सवलत करारनामा करावा.

७) सदर प्रकल्पाच्या सवलत कालावधीत पथकराचे दर सन २००४ च्या धोरणानुसार लागू राहतील. तसेच पथकर सवलत कालावधी दि.३०.०४.२०४५ पर्यंत निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ चे चौपदरीकरण आणि मुंबई ते पुणे द्रुतगती मार्गाचे ऑपरेशन, देखभाल व दुरुस्तीचे काम पथकर वसुलीच्या अधिकारासह मे.एम.आय.पी.एल. या कंपनीस सन २०१९ पर्यंतच्या सवलतीच्या कालावधीसाठी देण्यात आले आहे. सन २०१९ च्या पुढील पथकर संकलन तसेच रस्त्याची देखभाल व दुरुस्ती या दोन कामांसाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्यात यावे.

९) त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाकरीता पथकर संकलन तसेच रस्त्याची देखभाल व दुरुस्ती या दोन कामांसाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्यात यावे.

१०) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या तांत्रिक सल्लागार समितीने या प्रकल्पाची तांत्रिक छाननी करुन तांत्रिक बाबी तपासून नकाशे व अंदाजपत्रके सुयोग्य व परिपूर्ण आहेत असे नमूद केल्याची धारणा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने पक्की करावी. तसेच या प्रकल्पाच्या संबंधित मुख्य अभियंता यांनी प्रकल्पास तांत्रिक मान्यता द्यावी व तदनंतरच RFQ व RFP मागवावे.

११) सदर प्रकल्पाच्या सर्व तांत्रिक मान्यता घेण्याची व तांत्रिक बाबी काटेकोरपणे अंमलात आणण्याची जबाबदारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांची राहील.

१२) सदर प्रकल्पाच्या सर्व वित्तीय बाबींची जबाबदारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांची राहील.

१३) सदर प्रकल्पाचा देखभाल व दुरुस्ती खर्च हा प्रकल्पाच्या झालेल्या बांधकाम खर्चानुसार देय असेल, सदर खर्च प्रकल्प किंमतीनुसार देय राहणार नाही.

१४) सदर प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या सर्व केंद्र व राज्य शासनाच्या तसेच संबंधित इतर सर्व संस्थांच्या मंजूरी, ना हरकत प्रमाणपत्रे इत्यादी प्राप्त करुन तसेच प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या भूमीचे संपादन केल्यानंतरच, या प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

१५) सदर प्रकल्प राबवितांना शासनाचे प्रचलित धोरण व वेळोवेळी घेण्यात आलेल्या निर्णयाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्रमांक : १५४/१४६१, दि.०१.०४.२०१७ व क्रमांक : १०३/व्यय-११, दि.३०.०३.२०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७११२४१७१७४०६२१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Avinash Trimbakrao Dhondge

Digitally signed by Avinash Trimbakrao Dhondge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Division East, postalCode=411001, st=Maharashtra, 2.5.4.20=c027c83219049ab50c11c48a886d96688cd20f344566980536900a21e1d9a74b, serialNumber=4be0cd9a533d89e3ab5f3d01c44606657e57bbf30754f79095f947378c30d155, cn=Avinash Trimbakrao Dhondge
Date: 2017.11.24 17:22:16 +05'30'

(अविनाश त्रिं. धोंडगे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव,

२) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे खाजगी सचिव,

३) मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे खाजगी सचिव,

४) मुख्य सचिव,

५) अपर मुख्य सचिव (वित्त),

६) प्रधान सचिव (नियोजन),

७) प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम)

८) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित, मुंबई,

९) सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

१०) सचिव (बांधकामे) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

११) आ.वि.स. व उ.स., सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

१२) निवडनस्ती.

**परिशिष्ट – अ**

| अ.क्र. | विवरण | तपशिल | बांधकामाची किंमत (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| १. | द्रुतगती मार्गिकेच्या राहीलेल्या लांबीचे ८ पदरी नविन बांधकाम करणे (मिसिंग लिंक) | १३.३ कि.मी. | ३०६८.७९ |
| २. | खराब झालेले कॉंक्रीट पॅनेल्स बदलणे | निरंक | निरंक |
| ३. | द्रुतगती मार्गावरील अस्तित्वातील पथकर नाक्याचे क्षमता वर्धन करणे | ३ नग (खालापूर, तळेगाव, शेडुंग) | २१.४३ |
| ४. | खालापूर पथकर नाक्यापासून ते मिसिंग लिंकच्या सुरवातीपर्यंत द्रुतगती मार्गाचे ८ पदरीकरण करणे. | ६.२० कि.मी. | २२४.३९ |
| ५. | राष्ट्रीय महामार्ग ४ चे सहा पदरीकरण करणे | निरंक | निरंक |
| ६. | रिटेंनिंग स्ट्रक्चरचे दुरुस्तीकरण | - | निरंक |
| ७. | राष्ट्रीय महामार्ग ४ चे सहा पदरीकरण करणे | निरंक | निरंक |
| ८. | आकस्मित खर्च ३ टक्के | ३% | ९९.४४ |
| ९. | **एकूण EPC किंमत** | - | **३४१४.०५** |
| १०. | सुपरव्हिजन सल्लागार फी | ३% | ९९.४४ |
| ११. | गुणनियंत्रण चार्जेस | ०.२५% | ८.२९ |
| १२. | रस्ते सुरक्षा ऑडीट चार्जेस | ०.५०% | १६.५७ |
| १३. | बांधकाम कालावधीतील भाववाढ | ५% दरवर्षी तीन वर्षांकरीता | ६६०.९२ |
| १४. | **प्रकल्पाची अंदाजित किंमत** | - | **४१९९.२७** |
| १५. | सेवावाहिन्या हलविणे | ०.५% | १६.५७ |
| १६. | भूसंपादन व पुर्नवसन | - | ४९८.८२ |
| १७. | पर्यावरण प्रभाव मिटीगेशन, पर्यावरण व्यवस्थापन, वृक्षारोपण इ. | - | २.९७ |
| १८. | आय.सी./प्री ऑपरेटिव्ह खर्च | १% | ३४.१४ |
| १९. | फायनान्सियल चार्जेस | १% संपूर्ण कर्जावर | ४५.८० |
| २०. | **प्रकल्पाची एकूण भांडवली किंमत** | | **४७९७.५७** |